**निवडणूक तात्काळ**

राज्य निवडणूक आयोगाच्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील काळया/निळया मेमरी आयोगाच्या कार्यालयात जमा करण्याबाबत.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.रानिआ२०१३/जुमेमा/प्र.क्र.२/का.१२
नवीन प्रशासन भवन,मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई ४०००३२
दिनांक:-०३/०१/२०१४

## -:आदेश:-

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये वापरण्यात येत असलेल्या राज्य निवडणूक आयोगाच्या जुन्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमधील काळया/निळया रंगाच्या मेमरींचा वापर करण्यात येऊ नये, याबाबतचे आदेश दि.१८/०६/२०१३ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. त्यानंतरही काही ठिकाणी नजरचुकीने काळया/निळया रंगाच्या मेमरी वापरण्यात आल्याने मतदान प्रक्रीयेत व्यत्यय आला होता. तसेच काही ठिकाणी मतदान यंत्रे दुसऱ्या कार्यालयास उपलब्ध करुन देताना सुधारीत (रिफर्बिश) केलेल्या नवीन कंट्रोल युनिटमध्ये जुन्या काळया/निळया रंगाच्या मेमरी लावण्यात येत असल्याचेही आयोगाच्या निदर्शनास आले आहे.

**त्यामुळे जुन्या काळया/निळया रंगाच्या मेमरीचा पुन्हा वापर होऊ नये याकरिता न्यायालयीन प्रकरणाशी संबंधित काळया/निळया मेमरी वगळून इतर सर्व काळया/निळया मेमरी आयोगाच्या कार्यालयात सोबत दिलेल्या तक्त्यामध्ये माहितीसह दिनांक ३१/०१/२०१४पर्यंत विनाविलंब जमा कराव्यात. नगरपरिषदा/ नगरपंचायतींनी जिल्हाधिकारी कार्यालयातील आयोगाच्या. इव्हीएम ज्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात आहेत त्यांच्यामार्फत आयोगात जमा कराव्यात.**

**तसेच न्यायालयीन प्रकरणाशी संबंधित काळया/निळया रंगाच्या मेमरीसुध्दा न्यायालयाने अंतिम निकाल दिल्यानंतर आयोगाच्या कार्यालयात जमा करण्यात याव्यात. नगरपरिषदा/ नगरपंचायतींनी जिल्हाधिकारी कार्यालयातील आयोगाच्या इव्हीएम ज्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात आहेत त्यांच्यामार्फत आयोगात जमा कराव्यात.**

क्र.मा.प...२/

त्याचप्रमाणे यापूर्वी दि.१८/०६/२०१३ च्या आदेशाप्रमाणे भविष्यात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व सार्वत्रिक/पोट निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये पांढऱ्या रंगाच्या काढता येणाऱ्या मेमरीचाच (DMM) वापर करावा. कोणत्याही परिस्थितीत काळया/निळया रंगाच्या मेमरीचा वापर होणार नाही याची संपूर्ण दक्षता घ्यावी. जर सदर आदेशाचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत संबंधितांना हलगर्जीपणा व निष्काळजीपणाकरिता जबाबदार धरुन त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

मा.राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

( अविनाश सणस )
सहायक आयुक्त तथा प्रभारी उप आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रति,

१) विभागीय आयुक्त, (सर्व)
२) जिल्हाधिकारी, (सर्व)
३) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा/पंचायत समित्या(सर्व)
५) मुख्याधिकारी, नगर परिषदा/ नगर पंचायती (सर्व)
६) मा.आयुक्त यांचे स्वीय सहायक
७) प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक
८) आयोगातील सर्व कार्यासने
९) निवड नस्ती

# तक्ता

स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव :-

शेवटची निवडणूक झाल्याचा दिनांक:-

काळया/निळया मेमरीचा तपशील:-

| अ.क्र. | तपशील | काळया मेमरीची संख्या | निळया मेमरीची संख्या |
|---|---|---|---|
| १ | राज्य निवडणूक आयोग, इतर जिल्हाधिकारी कार्यालय, महानगरपालिका इ.कडून प्राप्त झालेल्या एकूण काळया/ निळया मेमरी | | |
| २ | सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ताब्यात असलेल्या परंतु न्यायालयीन प्रकरणाशी संबंधित काळया/निळया मेमरी. | | |
| ३ | इतर गहाळ झालेल्या किंवा खराब झालेल्या किंवा इतर कारणास्तव हिशोब लागत नसलेल्या काळया /निळया मेमरी | | |
| ४ | आयोगाच्या कार्यालयात जमा करता येतील इतक्या काळया/निळया मेमरी | | |